**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.०८/०४/२०१९**
**दि.०७/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २२०/१९,भादविक ३९२,३२३,३४ |
| **फिर्यादी** | विशाल सावंत, वय- २५ वर्षे,रा.के.के.मार्केट,कात्रज रोड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०४/२०१९ रोजी रात्रौ ०२/३० वा. स्वारगेट येथील कात्रज पीएमटी बस थांबा |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे कामावरुन सुटुन घरी जात असताना,ते कात्रज बस थांबा येथे बसची वाट पाहत उभे असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे कडील मोबाईल व २,५००/- रुपये रोख असा एकुण ७५००/- रू किंमतीचा ऐवज फिर्यादी यांना मारहाण करुन,जबरदस्तीने काढुन घेवुन चोरून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कदम ९८२३६२४५८५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २३०/१९,भादविक ३९४ |
| **फिर्यादी** | अभिषेक मिश्रा,वय-३१ वर्षे,रा.गोंधळेनगर,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/३० ते रात्रौ ०१/३० वा.चे दरम्यान एम्प्रेस गार्डनचे जवळ भैरोबानाला कॅनल रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे बालेवाडीहुन राहते घरी गोंधळेनगर हडपसर येथे एम्प्रेसगार्डन मार्गे भैरोबानाला कॅनल रोडने त्यांचे ॲक्टीव्हा गाडीवरुन जात असताना,त्यांचे गाडीस समोरुन येणाऱ्या दुचाकीवरील चालकाने एकदम कट मारल्यामुळे,फिर्यादी यांनी ब्रेक मारुन गाडी थांबवली असता,त्याचवेळी त्यांचे पाठीमागुन दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीचे ॲक्टीव्हा गाडीस पाठीमागून धक्का मारला व नुकसान भरपाई मागितली. त्यांचे बोलणे चालु असताना,फिर्यादी यांना समोरुन कट मारणारे इसम देखील तेथे येवुन फिर्यादी यांना धक्का-बुक्की करून,फिर्यादी यांचे दोन्ही तळहातावर दोन्ही अंगठयाचे मध्ये चाकुने मारुन जखमी करून,फिर्यादी यांचे जवळील बॅग व त्यामधील दोन लॅपटॉप, एक घाडयाळ, बॅकेचे एटीएम व क्रेडीट कार्ड,तसेच पाकीटा मधुन बॅकेचे एटीएम कार्डा मधुन काढुन ५,०००/- रु व पाकीटा मधील रोख २,५००/- रुपये जबरदस्तीने काढुन घेवून गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मोहिते ८३०८८४४००४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे १७१/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | हारुण पठाण, पो.ना. विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | ट्रक वरील अज्ञात चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०४/२०१९ रोजी सकाळी ०९/०५ वा. पाण्याची टाकी समोर कॅनरा बॅके जवळील रस्त्यावर लोहगाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील मुलगा विश्वास अभिमान कटीमणी,वय-०९ वर्षे,रा.सर्व्हेट कॉटर्स एअर फोर्स स्टेशन लोहगाव,पुणे हा सायकलवरुन जात असताना,यातील नमुद इसम ट्रकवरील अज्ञात चालकाने बेदरकापणे भरधाव वेगाने व हयगयीने वाहन चालवुन लेन कटींग करुन,विश्वास कटीमणी यास समोरून धडक देवुन,त्यास गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. डी.एन.ढोले ९८२२९०७१०० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ३०८/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | सिध्दार्थ रानडे,वय-३३ वर्षे,रा.धायरी,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०१/२०१९ ते दि.३१/०१/२०१९ रोजीचे कालावधीत फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांना नोकरीकरीता फेसबुक अकाऊंटवर मॅसेज पाठवुन नामांकीत मोटर्स कंपनीत नोकरी लावतो असे सांगुन,त्यांना वेळोवेळी त्याचे बँकेचे खात्यावर ४० हजार रूपये भरण्यास लावुन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) पाटील ९९२३०७११०० |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ३७३/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२३ वर्षे,रा.दिप बंगला चौक,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात हेल्पलाईनधारक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०३/२०१९ रोजी १८/५० ते १८/५५ वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचा मित्र यास पुण्यावरुन गोवा येथे कामानिमित्त जाण्याकरिता रेडबस व्दारे तिकीट बुक केले असता,रेड बसने बस क्रमांक न पाठविल्याने,फिर्यादी यांनी गुगल सर्चव्दारे रेडबस हेल्पलाईन नंबर सर्च करून,त्यावर क्लीक केले असता १८००४१९३७० हा नंबर डिस्प्लेवर आला. त्यानंतर नमुद इसमाने फिर्यादी यांना फिर्यादी यांचे बँकेचे डेबीट कार्डचे शेवटचे सहा अंक व ओटीपी नंबर घेवुन,फिर्यादी यांचे डेबीट कार्डची माहिती चोरुन,फिर्यादी यांचे बँकेचे खात्या मधुन ५७,७५०/- रुपये काढलेले आहेत. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. गलांडे ९०११०३७७६२ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २३१/१९,भादविक ३५३,३३२,५०४,५०६,४२७,३४ |
| **फिर्यादी** | तिरुपती लिंगान्ना, पोलीस हवालदार, वानवडी वहातुक विभाग पुणे |
| **आरोपी** | विकी राम परदेशी,रा.नोबेल बेकरी शेजारी,वानवडी,पुणे (अटक) व इतर दोन |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०४/२०१९ रोजी १८/१० वा.शिवरकर रोडवर,जांभुळकर चौक,वानवडी,पुणे चे पुढ |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे वानवडी वहातुक विभागात नोकरी असुन,ते नमुद ठिकाणी नो-पार्किंग मध्ये लावलेली वाहनांवर कारवाई करीत असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादी हे करत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण करुन,त्याचेशी हुज्जत घालुन,फिर्यादीचा शर्ट पकडुन त्यांना धक्का-बुक्की करून,अपशब्द वापरून,तुझे घर कोठे आहे हे मला माहीत असुन तुला पाहुन घेतो अशी धमकी दिली. तसेच फिर्यादी यांचे हातावर जोराने फटका मारल्याने त्यांचा मोबाईल पडुन मोबाईलचे नुकसान झाले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गुर्जर ९६५७०६८८१० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**